शासन वि. सोमेश

**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः हशम ईस्माईल हळदे,

वयः ६५ वर्षे, व्यवसायः शेती,

राहणारः सुडकोली, ता.रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१ दि.२२/१२/२०१८ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. सदर दिवशीचे पंचनाम्यावर माझी सही आहे. परंतू त्यातील मजकूर मला माहिती नाही.

**साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२२/१२/२०१८ रोजी पोलीसांनी मला व दुसरा पंच विलास हरिश्चंद्र फोडकर याला मौजे सुडकोली येथील दुर्गामाता गेट जवळ पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते, घटनास्थळ मला फिर्यादी कौशल ढवूळकर याने दाखविले होते, घटनास्थळ दुर्गा माता मंदिराच्या पश्चिमेस १० फुट अंतरावर होते, तेथे पोलीसांनी माझे समक्ष दिसत्या परिस्थीतीचा पंचनामा केला, त्यावर मी वाचून सही केली.

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादी कौशल ढवुळकर व आरोपी यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझे गावातील रहिवासी आहे, मी त्याला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, त्याला वाचविण्याकरीता मी आज न्यायालयात खोटी साक्ष देतो.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.पी.एच.पाटकर यांनी नाकारला.**

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE Date: 2025.01.03 14:54:05 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.०३.०१.२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.